Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University
Aurangabad – 431 004, Maharashtra, India
NACC Re-accredited 'A' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Academic/Syllabus : (0240) 2403118 /2403119 /2403115
Web Site : www.bamu.ac.in

स्थापना वर्ष : १९५८

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद- 431 004, महाराष्ट्र, भारत
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त
Office : Academic Section

कार्यालय :: शैक्षणिक विभाग ::

* परिपत्रक *

वाचा: १) विद्यापीठाने निर्गमीत केलेले शैक्षणिक वेळापत्रक दि. २७.०६.२०२०.
२) विद्यापीठाने निर्गमीत केलेले परिपत्रक दि. ३१.०७.२०२०.
३) ॲनलॉक-४ च्या संदर्भात केंद्र शासनाने निर्गमीत केलेले आदेश दि. २९.०८.२०२०.
४) ॲनलॉक-४ च्या संदर्भात महाराष्ट्र शासनाने निर्गमीत केलेले आदेश दि. ३१.०८.२०२०.

मा. कुलगुरु महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, विद्यापीठ परिसरातील सर्व विभागांचे शैक्षणिक वर्ग, उपपरिसराच्या विभागातील शैक्षणिक वर्ग व संलग्नीत महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ग प्रत्यक्षरित्या शिकविण्याचे/ अध्यापनांचे कार्य शासनाने आपत्ती व्यवस्थापन कायदा-२००५ अन्वये निर्गमीत केलेले आदेश दि.३१.०८.२०२० अन्वये दि. ३०.०९.२०२० पर्यंत बंद राहतील परंतू ऑनलाईन अथवा दुरशिक्षणाद्वारे देण्यात येणारे शिक्षण उक्त प्रकरणी अनुज्ञेय राहील तसेच ऑनलाईन द्वारे देण्यात येणाऱ्या शिक्षणास आपल्या स्तरावरुन प्राधान्य देण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणी आपल्या कार्यालयातील वर्ग-१ व वर्ग-२ अधिकाऱ्यांनी कार्यालयामध्ये १००% उपस्थित राहणे आवश्यक असून शासनाने निर्धारीत केलेल्या महानगर पालिका क्षेत्राअंतर्गत येणाऱ्या इतर संवर्गातील अधिकारी/ कर्मचाऱ्यानी ३०% किंवा एकुण संख्या ३० असल्यास यापैकी जे अधिक असेल तेवढया संख्येने उपस्थित राहणे आवश्यक आहे. तसेच महानगर पालिका क्षेत्राबाहेरील उर्वरीत क्षेत्राअंतर्गत येणाऱ्या कार्यालयामध्ये ५०% कर्मचारी किंवा एकुण संख्या ५० असल्यास यापैकी जे अधिक असेल तेवढया संख्येने सर्व संबंधीत कर्मचाऱ्यांनी कार्यालयामध्ये उपस्थित राहणे आवश्यक आहे.

प्रस्तुत प्रकरणी आपत्ती व्यवस्थापन कायदा-२००५ अन्वये निर्धारीत केलेल्या सर्व नियमांचे आपल्या स्तरावरुन तंतोतंत अनुपालन करुन सदरील नियमांचे उल्लंघन होणार नाही, याची कृपया नोंद घेवून दक्षता घेणे अनिवार्य आहे.

संदर्भ क्र. परिपत्रक/ शैक्षणिक विभाग/ २०२०-२१/ 13913

दि.०१.०९.२०२०.

उपकुलसचिव,
शैक्षणिक विभाग

प्रतः

१. अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

२. विभाग प्रमुख, (सर्व विभाग), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

३. संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उप परिसर, उस्मानाबाद.

४. विभाग प्रमुख, (सर्व विभाग), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उप परिसर, उस्मानाबाद.

५. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

६. संचालक, युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना देऊन विनंती करण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

७. समन्वयक, एम.के.सी.एल. राजर्षी शाहू महाराज परीक्षा भवन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

-=**=-

*Cir.Dr.Kct*010920/-*